
# बहू

राजीव तांबे



BVBK-0402806


[illegible] ठाणे, [illegible]
[illegible] विभाग.
[illegible] २८०६ दिनांक ९.९.९३
[illegible] बा.वा. [illegible]

हे पुस्तक
आम्हा मुलांचेच आहे बरं.


BVBK-0402806



# बंटू



राजीव तांबे



प्रकाशकः-
सुदेश हिंगलासूपूरकर ग्रंथघर प्रकाशन.
४६/१३९१ नेहरुनगर, कुर्ला (पू) मुंबई 400 024

प्रकाशन क्रमांकः १८


पहिली आवृत्तीः बालझुंबड, ६ डिसेंबर १९८८.

मूल्यः १८ रुपये.

मुद्रण :
अमित ऑफसेट,
भाऊ दाजी रोड, मांटुगा १९

शुभा तांबे
202, पूर्णिमा दर्शन
अक्षय हॉस्पिटलच्या मागे
श्रीखंडे वाडी डोंबिवली (पू) 421 201

मुखपृष्ठ/कथा चित्रे
देवदत्त पाडेकर
एल. टी. - २३/२१ विजय नगर, मरोळ, मुंबई 400 059



का०वा.
२८०६
९।८।९३

म. वं. वं. ठाणे, [illegible]
बाल वाङ्मय विभाग.
दा. क. २८०६ दिनांक ९।८।९३
विषय का.वा. क. ..........

हे पुस्तक
आम्हा मुलांचेच आहे बरं.

BVBK-0402806




# बंटू हुशारोबा


पिंकी आणि बंटू बहीण-भाऊ.

खरं म्हणजे पिंकीचं नात्र होतं रेणू. तिला लहानपणापासून सगळे जण पिंकीच म्हणत. तर कुणी पिंकू म्हणत.
पण रेणू मात्र कुणी म्हणत नसे.
पिंकी होती इयत्ता दुसरीत.
बंटू अजून शाळेत जाण्याएवढा मोठा नव्हता.
बंटू, गोबऱ्या गोबऱ्या गालांचा, नकट्या नाकाचा, कुरळ्या केसांचा आणि लबाड डोळ्यांचा होता.
बाबा त्याला पाहिल्यापासूनच बंटू किंवा बंटी म्हणत.
घरात तो सर्वांचा लाडका होता.
पण तरी सुद्धा बंटूला सारखं वाटे की, सारे जण पिंकीचेच लाड करतात; माझे लाड कुणीच करत नाही.


पिंकी शाळेत निघाली की बंटू पहात राही.
तिचं दप्तर, वह्या-पुस्तके, पाण्याची बाटली, खाऊचा डबा आणि पेन्सिली ठेवायला एक रंगीत डबी.
आणि अगदी शाळेत निघताना तर ताई निळ्या-निळ्या फ्रॉकवर एक छानदार रंगीत बिल्ला छातीवर लावून जायची.
हे सर्व रोज रोज पाहून बंटूने हट्ट धरला आईकडे.
बंटू म्हणाला, ''मलाही असच सगळं ताई सारखं पाहिजे. अगदी आत्ता पाहिजे.''
आईने बंटूची समजूत काढत म्हटलं, ''अरे बाळा, अजून तू लहान आहेस. पुढच्या वर्षी तू शाळेत जाशील तेव्हा सगळं तुला घेऊ.''




पण बंटूची समजूत काही केल्या पटेना.
दिवसभर त्याने आईला भंडावून सोडलं.
संध्याकाळी पिंकीताई शाळेतून घरी आली तरी बंटूची भुणभूण सुरूच होती.
पिंकू त्याला चिडवत म्हणाली, "वा रे व्वा! म्हणे मला दप्तर पाहिजे. पेन्सिल पाहिजे. आधी ग म म न काढ; मग मिळेल पेन्सिल. दगडोबा कुठला."
हे ऐकल्यावर बंटू रुसला.
बंटू ताईला म्हणाला, "आम्ही दगडोबा तर दगडोबा. तुला काय करायचं आहे?" ताईला काय उत्तर द्यावे, हेच त्याला कळेना.
त्याचे डोळे पाण्याने डबडबले.
तो एकटाच कोपऱ्यात जाऊन बसला. पडद्यामागे उभा राहून डोळे पुसू लागला.
अगदी गप्प झाला.
पिंकीलाही वाईट वाटलं.
तिला वाटलं, आपण असं बोलायला नको होतं.
पिंकी जाऊन बंटूची समजूत काढणार इतक्यात बाबा आले.
बाबांना पहाताच पटकन बंटू बाबांकडे धावला.
आता बंटू आपलं नाव बाबांना सांगणार आणि त्याला चिडवलं म्हणून आपल्याला मार मिळणार असं वाटल्याने पिंकी हळूच आईकडे पळाली.
पण ताईने चिडवल्याचं बंटू विसरूनच गेला.
बंटू बाबांना म्हणाला, "बाबा, बाबा, मला किनई, तुम्ही एक छानशी रंगीत पेन्सिल आणा. ताईसारखी काळी शिसपेन्सिल मला



नाही आवडत.
''मी रंगीत पेन्सिलीने खूप खूप रंगीत अभ्यास करीन. चित्र काढीन.
ग म भ न लिहीन.
''ताईची फजिती करीन आणि मोठ्ठा हुशारोबा होईन.''
बाबा हसत हसत म्हणाले, ''काय होणार आहेस तू बंटू?''
बंटू जोरात म्हणाला, ''मोठ्ठा हुशारोबा.''
आई सुद्धा स्वयंपाकघरात हसू लागली.
तेव्हा बंटू गाल फुगवून म्हणाला,'' मी ओभ्यास कोरत नाही, म्हणून
ताई मला दगडोबा म्हणते. पण आता मी खूप खूप ग म भ न
लिहून मोठ्ठा हुशारोबा होणार आहे बरं.''
हे ऐकताचं बाबांची हसून हसून मुरकुंडी वळली.
आई-बाबा बंटूला का हसतात हे पहायला, हातातला खेळ
टाकून पिंकी धावतच आली.
पिंकी बाबांच्या खांद्यावर डोकं घासत म्हणाली, ''काय झालां हो बाबा?
इतके का हसताय?''
पण इतक्यात बंटूने बाबांकडे पहात डोळे मोठे केले.
बंटू म्हणाला, ''बाबा, सांगू नका हं! ही आपल्या दोघांची
गंमत बरं. मी 'ते' 'ते' झालो ना, की मग सांगा हं ताईला. आधी नको.''
आता चिडायची पाळी ताईची होती.
ताई म्हणाली, ''नको तर नको. मग मीदेखील एक गंमत
सांगणार नाही.''
सगळे एकदम ओरडले, ''कुठली गंमत? सांग ना ग लवकर''.
पिंकू आलेला राग विसरून सांगू लागली.



"आज किनई सईने, तिच्या वाढदिवसानिमित्त सगळ्यांना
एकेक रंगीत पेन्सिल वाटली.
"पण मला एकटीला दोन पेन्सिली दिल्या. आणि माझ्या कानात
म्हणाली, एक, घरी गेल्यावर बंटूला दे बरं."
असं म्हणत ताईने फ्रॉकच्या खिशातून एक लाल व एक निळी
पेन्सिल बाहेर काढली.
पिंकी म्हणाली, "लाल पेन्सिल मला आणि निळी बंटूला. होकि नई बंटू?"
त्यावर रागाने बंटू म्हणाला, "मला बुवा लालमलालच पेन्सिल हवी."
बाबा म्हणाले, "अरे लालच का रे?"
बंटू म्हणाला, "मी त्याने चित्र काढणार आहे."
हे ऐकताच बंटूला वेडावून दाखवत पिंकी म्हणाली. "मोठा चित्र
काढणारा तू माहीत आहेस. चित्रंच काढायची तर निळ्या
पेन्सिलीने काढ की."
त्यावर बंटू चिडून म्हणाला, "वा ग व्वा! अग, गुलाब कधी
निळे असतात कां? बाबा, तुम्ही सांगा ना हो ताईला.
मी गुलाबाचं चित्र काढणार आहे. म्हणून मला लालमलालच
पेन्सिल हवी हो."
बंटूचा राग पाहून ताई खुदकन हसली.
तिने दोन्ही पेन्सिली बंटूलाच दिल्या.
"आता तरी खूश ना माझा बंटूल्या?" असं म्हणत पिंकू ताईने
पटकन बंटूची पापी घेतली.
बंटू इतका लाजला की,
त्याचे गुलाबासारखे गाल
झाले पेन्सिलीसारखे लाल.




# बंटूची मैत्रीण

काल रात्री झोपताना बंटूला आईने 'कालीया' नागाची गोष्ट सांगितली.
कालीया नाग लोकांना कसा त्रास देई, कृष्णाचे मित्र यमुना नदीच्या काठावर कसे खेळत, आणि छोट्या कृष्णाने कालीयाला कसं मारलं... गोष्ट ऐकता ऐकताच बंटूला झोप लागली.

सकाळी उठल्यावर बंटू आईला म्हणाला, "आई, आई, आता किनई, मी पण नागाला घाबरणार नाही. मी देखील त्याला चांगला मारीन. कृष्णासारखा मी पण शूरवीर आहे."
त्याचं हे बोलणं ऐकताच पिंकूताई त्याला वेडावून म्हणाली, "हो माहीत आहे, मोठ्ठा शूरवीर. तोंड बघा! अरे बंट्या, ते बघ पायाखाली झुरळ..."
झुरळाचं नाव ऐकताच बंट्याने पटकन उडी मारली आणि सैरावैरा पळत सुटला.
सगळेजण खो खो हसू लागले. कारण तेथे झुरळच नव्हतं. पिंकूताईने फक्त गंमतच केली होती.
आपल्याला फसवलं कळताच बंटूला राग आला. तो रागारागाने म्हणाला, "मग काय झालं? कृष्णसुद्धा झुरळाला घाबरायचा आणि नागाला मारायचा. हो किनई ग आई?"
आईने बंटूला जवळ घेत म्हटलं, "हो, अगदी खरं! पण बंटू,



तू आज मात्र सापाला, नागाला मारूबिरू नकोस. तू कृष्णाएवढा मोठा झालास ना,
की नागच तुला घाबरायाला लागतील बघ.''
बंटूने लगेच विचारलं, ''तेव्हा मला झुरळ पण घाबरेल का ग?''
आई म्हणाली, ''हो रे बाबा, हो. आता जा बघू. जरा अंगणात
खेळ. मला ताईची शाळेची तयारी करायची आहे.''
बंटूला शाळा नसल्याने त्याला सबंध दिवस मोकळाच असे.
''मला थोडा खाऊ दे ना ग खिशात ठेवायला.'' बंटू म्हणाला.
आईने थोडे शेंगदाणे बंटूला दिले.
त्यावर बंटू म्हणाला, ''आणि माझ्या चिऊताईला?''
आईने थोड्या तांदळांच्या कण्या बंटूच्या हातावर ठेवल्या.
पिंकूताईला वेडावून दाखवून बंटू अंगणात पळाला.
पिंकू मात्र अजून हसतच होती. मग आईनेच पिंकूला दटावलं.




बंटू अंगणात गेला. अंगणातल्या बकुळीच्या
झाडाखाली त्याने हातातल्या कण्या पसरून ठेवल्या.
चिमण्या तर बंटूची वाटच पहात होत्या.
चिमण्या चिव चिव करत तांदूळ वेचू लागल्या. बंटूच्या
अंगाखांद्यावर खेळू लागल्या. त्या सगळ्या चिमण्या बंटूच्या
ओळखीच्या होत्या. रोज सकाळी बंटू त्यांच्यासाठी खाऊ
घेऊन येई.

आज एक वेगळीच गंमत झाली. बंटूने तांदूळ
पसरताच बंटूच्या सगळ्या मैत्रिणी दाणे टिपायला आल्या.
पण एक इटुकली चिमणी वरच्या फांदीवर बसून होती. ती
बंटूला म्हणाली, ''बंटूभाऊ, बंटूभाऊ, मी खाऊ का 'तांदूळखाऊ'?''


त्यावर बंटू हसत म्हणाला, "खा खा, खाऊ खा. मजेत मजेत गाणं गा"
त्याबरोबर ती चिमणी सुर्र सुर्रकन गिरकी घेत खाली आली.
टिप टिप दाणे टिपू लागली. भर्रकन उडून घरट्यात गेली.
आपल्या पिल्लांना दाणे भरवले. पुन्हा सुर्रकन खाली आली.
खिशातला ऐकेक दाणा खात बंटू तिची धावपळ पहात
होता. तो आरामात पाय पसरून झाडाखाली बसला होता.
इतक्यात एक चिमणीआजी बंटूच्या
पायावर येऊन टुपकन बसली. ती बंटूला ऐटीत म्हणाली,
"ही कोण तुला माहीत आहे का?"
बंटू म्हणाला, "हो. ही तर चिमणी."
त्याबरोबर फर्र करून सगळ्या चिमण्यांनी आपापले पंख
फडफडावले. चिमण्या अशाच हसतात हे बंटूला माहीत
होतं.
चिमणीआजी रागावून म्हणाली, "बंटूदादा, हसू नकोस.
नाहीतर तुझ्या हातातले दाणे मीच खाऊन टाकीन."
त्याबरोबर बंटूने मूठ गच्च बंद केली. आणि तो न हसता
ऐकू लागला.
चिमणीआजी सांगू लागली, "ही नवीन चिमणी किनई काल
संध्याकाळी इथे आली. आपल्या पिल्लांना घेऊन. म्हणाली,
'मी इथे राहू का?' आम्ही म्हटलं, 'एवढं मोठ्ठं झाड आहे.
कुठेही रहा. मजेत रहा.' आणि तिला किनई इथपर्यंत
पोचवायला एक घार पण आली होती. आम्ही सर्वजणी
थोडा वेळ घाबरलोच बाई."



तेवढ्यात चिव चिव करत ती नवीन चिमणी तिथे आली
आणि म्हणाली, "मी इथे का आले माहीत आहे का तुम्हांला?"
बंटूने उरल्यासुरल्या दाण्यांचा बकाणा भरत म्हटलं,
"नॉही बोवा."
"मग ऐका तर जंमत." असं म्हणत चिमणी गोष्ट सांगू लागली.

"ह्या गावाबाहेर एक छोटंसं रान आहे. त्या रानात
एका छोट्याशा झाडावर माझं एक छोटंसं घरटं होतं. आणि
त्या झाडाच्या खाली एक काळा-काळा साप रहायचा.
तो नेहमी माझ्याकडे रागाने बघायचा..."
साप म्हणताच आरामात बसलेला बंटू एकदम ताठ झाला.
त्याबरोबर ती नवीन चिऊ म्हणाली, "घाबरू नकोस रे बंटूदादा,
ऐक तर गंमत... माझी आणि झाडाची दोस्ती होती. माझी
पिल्ले लहान होती. ती तर सापाला खूप घाबरायची. त्याला
पहाताच चिं चिं ओरडायची. त्यामुळे पिल्लांना एकटं सोडून
मी कुठेच जात नसे..."
"मग त्यांना खाऊ कोण आणणार?" बंटूने शंका विचारली.
"अरे सांगते बाबा", चिऊ सांगू लागली. "बाजूच्याच झाडावर
आणखी एक चिमणी होती. ती माझी मैत्रीण होती. मी
मुलांसाठी खाऊ आणायला गेले की माझी मैत्रीण माझ्या
घरी बसे. झाडाखालच्या सापाचं माझ्या पिल्लांकडे बारीक लक्ष असे.

"एक दिवस सकाळी मी पाहिलं तर सापाचं घर
रिकामं. दुसऱ्या दिवशी पाहिलं तर, पुन्हा घर रिकामंच.
आणि तिसऱ्या, चौथ्या दिवशीसुद्धा घर रिकामंच. मला



वाटलं, बहुधा कंटाळून साप पळून गेला असावा. मला खूप बरं वाटलं. मग मी पाचव्या दिवशी पिल्लांना एकटं ठेवून दाणे आणायला गेले.

"दाणे घेऊन आले आणि पहाते तो काय?
पिल्लं बिचारी घाबरलेली. ती बिचारी रडवेली झालेली. मला कळेचना काय झालं ते. पिल्लं फक्त चिं चिं करायला लागली. त्यांना नीट बोलताही येईना.
"इतक्यात झाड सळसळू लागलं. झाड म्हणालं, 'अग चिऊताई, अग वेडाबाई, तू दाणे आणायला गेल्यावर तो काळा काळा साप आला होता. तुझ्या पिल्लांना खायाला.
"बापरे! मी इतकी घाबरले की मला रडूच आलं. मी पटकन माझ्या पिल्लांना पंखाखाली घेतलं.
"पण झाडाने मला धीर दिला. झाड म्हणालं, 'घाबरू नकोस चिऊताई. गंमत तर ऐक. साप काही घर सोडून गेला नव्हता. तो तर दुसरीकडे जाऊन लपला होता. तू बाहेर गेल्यावर तो साप फुस्-फुस् करत आला. आणि तुझं घरटं शोधू लागला. मग मी एक युक्ती केली. माझ्या सगळ्या फांद्या, त्यांची पानं अगदी जवळ जवळ आणली. आणि तुझं घरटं लपवून टाकलं पानांत. त्यामुळे घरट्यावर सगळा काळोख पसरला. तुझ्या पिलांना वाटलं, रात्र झाली, म्हणून ती शहाण्या मुलासारखी आवाज न करता शांत झोपी गेली.
"सापाने खूप शोध शोध शोधलं. पण त्याला काही तुझं




घरटं मिळालंच नाही. आणि तो वेडा साप घरटं शोधत शोधत खूप वरपर्यंत गेला. शेंड्यावर बसली होती घार, तिने पटकन सापाला दोन पायांत पकडलं. घार उडाली उंच उंच आभाळात. तिने सापाला गरगर फिरवलं आणि खाली टाकून दिलं.''

''बिचाऱ्या सापाला खूप लागलं असेल नाही का ग? इतक्या उंचावरून पडल्यावर भीतीच वाटते बुवा.''

''झाडं क्षणभर गदगदले. त्याच्याने बोलवेना. साप माझा वैरी असला तरी झाडाला त्याच्याविषयी प्रेम होतं. सापाला अशी शिक्षा झाली हे आठवताच झाडाची पानं क्षणभर ओलसरं झाली. मलाही वाईट वाटलं...''

हे सारं ऐकताना बंटूचा चेहरा पण उदास झाला होता. चिमणी पुढे सांगू लागली, ''झाड थोड्याच वेळात सावरलं. ते म्हणालं, आता तू गावात जा. असं



एकटं-एकटं जंगलात रहाणं शहाणपणाचं नव्हे. पुढच्या महिन्यात वसंत ऋतू येतोय. त्या वेळी आमची खूप घाई असते. त्यामुळे मला नेहमीच लक्ष द्यायला वेळ मिळणार नाही.' मग त्या जंगलझाडानेच मला ह्या झाडाचा पत्ता सांगितला. मला इथपर्यंत पोचवायला त्या झाडावरची घारसुद्धा आली होती.

''मग, राहू ना रे बंटूदादा मी इथे?''


''आँ!'' बंटू एकदम जागा झाल्यासारखा ओरडला. त्याने खिशात हात घातला. अजून एक दाणा शिल्लक होता. पण त्याने तो न खाता चिमणीला दिला.

बंटू म्हणाला, ''तुझ्या बाळांना सांग, बंटूदादाने खाऊ दिलाय.''

आपल्याला नवीन मैत्रीण मिळाली म्हणून आनंदात बंटू आईकडे धूम पळाला.

चिमण्यासुद्धा चिवचिवाट करत भुर्रकन पळाल्या.





# बंटूची होडी



आज पहाटेपासूनच पाऊस रिमझिमत होता.

बंटू पांघरूण न घेताच झोपला होता. थंडी वाजू लागताच त्याने हळूच पिंकीताईचं पांघरूण ओढून घेतलं.

थोड्या वेळाने मग पिंकीताईला थंडी वाजू लागली. पहाते तर काय, बंट्याने आपलं पांघरूण पळवलं आहे. आणि पांघरुणात लपून, डोळे किलकिले करून, बंटू गंमत पहातोय.

मग दोघांची मस्ती सुरू झाली.

ह्या दोघांचा आवाज ऐकून आई आली.

आईला पहाताच बंटू पटकन ताईच्या कानात काहीतरी कुजबुजला आणि त्यांची मस्ती पुन्हा जोरात सुरू झाली.

आईने येऊन त्यांचं पांघरूण हिसकावून घेतलं. आई म्हणाली, ''चला उठा आता. बास झाला दंगा.''

इतक्यात बंटू आणि पिंकू एकदम म्हणाले, ''आई, आई, आज बाबांना सुट्टी घ्यायला सांग ना ग. आज आपण पावसात भिजूया. कणसं खाऊया. नदीवर फिरायला जाऊया.''

आईच्याही मनात तेच होतं. पण आई म्हणाली, ''तुम्हीच सांगा बाबांना. तुमचंच ऐकतील ते.''

बाबांचा नुकताच चहा पिऊन झाला होता. ते

आरामात आरामखुर्चीत बसून बाहेर पडणारा पाऊस पहात होते. इतक्यात बंटू आणि पिंकू धावत आले.

आज वटपौर्णिमा असल्याने पिंकूच्या शाळेला सुट्टी होती. आणि बंटू काही अजून शाळेत जात नव्हता.

बंटू धडाधडा धावत आला. आणि धपकन बाबांच्या मांडीवर उभा राहिला, तर पिंकी बाबांच्या मांडीवर चढून बसली.

हे इतक्या पटापट झालं की बाबांना क्षणभर कळलंच नाही काय झालं ते. ते जरासे घोटाळलेच.
स्वयंपाकखोलीतून आई हळूच पहात होती. बाबा घाबरले हे पाहिल्यावर तिलाही हसूच आलं.
"अरे काय ही मस्ती. काय ही दांडगाई. पडाल की तुम्ही." असं म्हणत बाबांनी दोघांना नीट मांडीवर बसवलं.


बाबा सहज म्हणाले, "अरे मुलांनो, आज इतका छान पाऊस पडतोय, पावसात भिजायचं कां आपण सर्वांनी? टॉपपैकी नदीवर जाऊ फिरायला."

हे ऐकाल्यावर बंटू आणि पिंकू "हॉ-हॉ" करून ओरडले.

बंटूने तर आनंदाने बाबांच्या गळ्याला मिठी मारली.

पिंकू टुणकन उडी मारून आईकडे गेली.

बंटूच्या गावाला वळसा घालून एक सुंदर नदी जामची. होय, त्या नदीचं नावच 'सुंदर नदी' होतं. नदीत रंगीबेरंगी मासे होते. काठावर पांढरे धुप्प बगळे होते.




पावसाळ्यात कुठूनसे बेडूकसुद्धा येत. नदीच्या वाळवंटात काही ठिकाणी रंगीत दगड मिळत, तर काही ठिकाणी गोगलगाईंची गर्दी असे. पावसाळ्यात नदी फुगून तट्ट होई. नेहमीच रुपेरी शांत पाणी वाहून जाई. तिथे खळाळतं गढूळ पाणी येई. उन्हाळ्यात नदीच्या पुलावर उभं राहिलं की खाली आपलं प्रतिबिंब दिसे. पण पावसाळ्यात पुलावर उभं राहिलं की खाली नदीचा झपाटा पाहूनच भीती वाटे.

नदीवर जाणारी पाऊलवाट एका मैदानातून जायची. पाऊस पडून गेला की सारं मैदान कसं हिरवंगार होऊन जाई. त्यातसुद्धा किती गंमत.

कुठे करकरीत हिरवे गवत. तर कुठे लुसलुशीत पोपटी गवत. कुठे छोटुलं काळपट हिरवं गवत, वाऱ्यासंगे डोलणारं. तर कुठे जर्द हिरवं गवत, काटेरी पात्यांचं, वाऱ्यालाच ओरबाडणारं. त्यामुळे मैदानातली पाऊलवाट गवतात मिसळून जायची. हिरवीच व्हायची. मैदानातली जाडजूड झाडे भराभर हिरव्या टोप्या घालत. तर उंच उंच झाडे हिरवे हिरवे डगले घालत. जाडजूड झाडं, आपली रंगीत रंगीत फुलं, हिरव्या रोप्यांत खोचून ठेवत. तर उंच उंच झाडे, आपली गोड गोड फळे, हिरव्या कोटांच्या खिशांत ठेवत.

पाऊस थांबून गारगार वारा सुटला की, झाडांची खसखस, गवतावर टपटप, बेडकांचं डराँव डराँव, बगळ्यांचं क्वाँ-क्वाँ, नदीची खळखळ, गवताची सळसळ सुरू होई. वातावरणात एक प्रकारचा ओला वास भरून राही.



बंटू-पिंकूला हे सारं खूप आवडे. आणि म्हणूनच पावसात नदीवर फिरायला जाऊया असं ते बाबांना सांगत.

पण आज वेगळीच गंमत झाली.

सकाळपासून रिमझिमणाऱ्या पावसाने थोड्याच वेळात जोर धरला. धो-धो पाऊस सुरू झाला. आभाळ फाटलांय की काय वाटू लागलं. अंगणातली झाडंसुद्धा नीट दिसेनात. हा मुसळधार पाऊस पाहून बंटू घाबरलाच. तो खिडकीतून पाऊस पाहू लागला. अंगणात पावसाचं तळं झालं होतं. आकाश ढगांनी इतकं भरलं होतं की ते आता खालीच येतं की काय असं वाटत होतं. बंटूचं आवडतं बकुळीचं झाड तर डोळे मिटून शांत उभं होतं. बिचाऱ्या त्या झाडाला पाऊस चांगलाच झोडपत होता.

इतक्यात टूपकरून बंटूच्या मानेवर एक गारेगार थेंब पडला. बंटू केवढ्याने दचकला. तो चटकन खिडकीपासून लांब झाला. आणि पहातो तर काय, छपरातून पाण्याची धारच लागली होती. तिकडे बादली ठेवेपर्यंत घरात अजून एकदोन ठिकाणी पाऊस सुरू झाला.

बंटूने धावत धावत बाबांना बोलावलं. बाबा आले पळत पळत.

बाबा हसत हसत म्हणाले, "बरं झालं घरातच पाऊस सुरू झाला. आज तुला पावसात भिजायचं होतं ना? चला, आता ह्या घरातल्या पावसात भिजून घे. अंगणातल्या नदीत खेळून घे".

बाबा घरात कामाला लागले.

बंटूने पिंकीताईला हाक मारली. पण पाहिलं तर पिंकी



अंगणातल्या नदीत होड्या सोडत बसली होती.

बंटूला पहाताच पिंकी म्हणाली, ''अरे बंटू, ये ये लवकर. ही बघ मी तुझ्यासाठी होडी बनवलीय रे.'

होडी पहाताच बंटू धपाधपा धावत सुटला. तो पिंकूच्या अंगावरच आदळणार होता.

''अरे दांडग्या, पाडशील ना मला नदीत,'' असं म्हणत पिंकूने बंटूला होडी दिली. बंटूने अंगणातल्या नदीत होडी सोडली.

आपली होडी पुढे जाण्यासाठी बंटू पाण्यावर थापट्या मारू लागला.

बंटूची होडी तिकडेच उड्या मारी. पण ताईच्या होडीच्या पुढे काही जाईना. ताईला मजा वाटत होती. बंटू मात्र खोटा खोटा हसत होता. पण आतून रागावला होता. तो मनातल्या मनात काहीतरी युक्ती शोधत होता.

थोड्या वेळात पावसाचा जोर कमी झाला.
आणि हळूहळू पाऊस थांबलाही. तरी घरात पावसाची
आणि अंगणात पागोळ्यांची टपटप सुरूच होती.




आता बंटूची होडी ह्या उरल्यासुरल्या पावसात नाचू लागली. आणि त्याबरोबर बंटूने गाणं म्हणायला सुरुवात केली :

''उरल्या सुरल्या पावसात
होडी नाचू लागे
अग अग होडी, तू
ताईला टाक मागे.

उरल्या सुरल्या पावसात
होडी लागे पळू
अग अग होडी तू
मागे नको वळू.

उरल्या सुरल्या पावसात
होडी, ताई, पुढे पुढे
अग अग होडी बघ
ताईला आले रडे.''



पिंकूला खूप वाईट वाटलं. पिंकूच्या डोळ्यांत उरलंसुरलं पाणी आलं.

हा सर्व खेळ, बंटूचा आरडाओरडा बाबा लांबून पहात होते.

बाबांनी पिंकूला जवळ घेत थोपटत म्हटलं, ''अग, वेडी की काय तू? अग पिंके, बंटूची होडी पहिली आली म्हणजे तुझीच होडी पहिली आली. हो किनई?''

पिंकूला कळेना बाबा असं का म्हणतात ते.

तिचा गोला गोला चिंतातुर चेहरा पाहून बाबा हसतच म्हणाले, ''अग, बंडूला कुठे येतात होड्या करायला? त्याला काय माहीत? अग ताई, तूच केलेली होडी पहिली आली! आहे किनई गंमत?''

आता मात्र पिंकूचा चेहरा खुलला.
आणि आनंदाने तिच्या डोळ्यांतलं उरलंसुरलं पाणीदेखील खळकन वाहून गेलं.

तिने बंटूसाठी अजून एक नवीन होडी केली.

बंटूला बोलवायला घरात पळाली.
आणि खरंच की! बंटूचं गाणं ऐकून उरल्यासुरल्या पावसातली, ती उरलीसुरली होडी, उरल्यासुरल्या वाऱ्याबरोबर हळूच ताईच्या पुढे गेली.

बंटूला खूप खूप आनंद झाला. तो आनंदाने उड्या मारू लागला. टाळ्या वाजवू लागला. गोल गोल गिरक्या घेऊ लागला. आपण ताईची फ-फ फजिती केली म्हणून ओरडत-नाचत आईला सांगायला गेला.

# बंटूचा खाऊ, खूप खूप खाऊ

पिंकूताईने बंटूला एक छानशी लाल पेन्सिल भेट दिली. लालमलाल पेन्सिल मिळाल्याने बंटू अगदी खूश होता. तो शाळेत जात नसल्याने, ह्या लाल रंगाच्या पेन्सिलीने चित्रं काढावीत? की अभ्यास करावा? की दोन्ही करावं? त्याला कळेना.

बंटूने ठरवलं, आपण चित्रंच काढायची.

बंटूला लाल पेन्सिल मिळाल्यापासून आईचा त्रास मात्र वाढला. जिथे घरात रिकामी जागा आहे, स्वच्छ जागा आहे, तिथे तिथे लाल गुलाब फुलू लागले.

भिंतीवरच्या, दारावरच्या, फरशीवरच्या गुलाबांची पानेसुद्धा लाल आणि त्यांचे काटेसुद्धा लाल.

इतकंच काय, पण काही चित्रांतील गुलाब कुठले आणि त्यांची पाने कुठली, हेच आईला ओळखता येईना.


गुलाब पुसता पुसता आई कंटाळून गेली.

एकदा अशीच गंमत झाली. बंटूने एक टॉप-पैकी फूल भिंतीवर काढलं. हे गुलाबाचं फूल त्याला खूप आवडलं.

आणि आईनेही, बंटूची पाठ वळताच हळूच ते पुसून टाकलं.

इतक्यात बंटूला आठवलं की, अरे, आपण त्याला पाने काढलीच नाहीत.

म्हणून तो पुन्हा भिंतीकडे वळला.



पण पहातो तर काय? फूल गायब!

त्याला कळेचना, असं कसं झालं?

बाजूला आई उभी राहून बंटूकडे पहात हसत होती.

आई हसत-हसत म्हणाली, "बंट्या, तू फूल शोधतो आहेस का?"

बंटू रडवेला होऊन म्हणाला, "हो ग आई. आता मी फूल काढलं आणि ते इतक्यात कुठं गेलं?"

आई म्हणाली, "अरे, वेडा ग बाळ माझा. तुला काहीच कसं कळत नाही बंटू. अरे हे बघ. मी ते फूल वेणीत घातलंय."

खरंच की! आईच्या वेणीत गुलाबाचं फूल होतं.

बंटूचे डोळे मोठे झाले आणि भुवया गोल झाल्या.


आईने भिंतीवरचं गुलाबाचं फूल कसं काय काढलं? हेच त्याला कळेना.

बंटूचा असा आश्चर्यचकित चेहरा पाहून आईने त्याला पटकन उचलून कडेवर घेतलं.

बंटूचा पापा घेत आई म्हणाली, "अगदी खुळं ग पोर माझं."

बंटूला खाली ठेवून, आई स्वयंपाकघरात कामाला निघून गेली.

आपण भिंतीवर काढलेलं फूल आईने डोक्यात घातलं ह्याच आनंदात बंटू त्यांच्या मांडीवर चढून बसायचा.



कधी लाडात येऊन विचारी, "बाबा, आज मला काय आणलंय?"

मग बाबा, कधी बंटूला खाऊ देत, कधी रंगीत चित्राचं पुस्तक तर कधी एखादी गोष्टच सांगत.

कधी कधी बाबा म्हणत, "बंट्या, आज तुला मी असा खाऊ देणार आहे की, तो तुला खूप खूप आवडेल."

हा खाऊ बंटूला माहीत होता.

तो लगेच ओरडे, "गोड गोड पापा, हो ना बाबा?"

पण आज एक वेगळीच गंमत झाली. आज जेव्हा बाबा घरी आले तेव्हा बंटू तयारीतच होता.

बाबा घरी आले. हाशहुश करत खुर्चीत बसले.

बाबा बंटूच्या आईला म्हणाले, "अग, जरा पाणी आण ग प्यायला. अगदी घसा कोरडा पडलाय."


आईने लगबगीने गुळाचा खडा आणि पाणी आणलं.

पाणी पिऊन बाबा म्हणाले, "काय ग, बंट्या-पिंकू कुठे दिसत नाहीत, कुठे बाहेर गेले की काय?"

"पिंकी आज सईकडे खेळायला गेली आहे. आणि बंटू घरातच लपून बसलाय." अस आई बाबांशी बोलत असतानाच हळूच बंटू आला आणि बाबांच्या खुर्चीपाठी लपला.

आई स्वयंपाकघरात गेली तेव्हा बाबा म्हणाले, "एक मुलगा शहाणा, मजेत खातो बेदाणा. कोण बरं हा मुलगा?"

पटकन बंटू ओरडला, "मी मी मी."



बाबा म्हणाले, "कसं पकडलं लबाडाला"

आणि त्यांनी बंटूला उचलून पटकन मांडीवर घेतलं.

बंटू आपलं नकटं नाक उडवत आणि ओठांचा चंबू करत बाबांना म्हणाला, "बाबा, बाबा, आज किनई मी तुम्हांला एक गंमत देणार आहे. अगदी तुमच्या आवडीची गंमत."

"कुठली बरं?" बाबासुद्धा विचारात पडले.

बंटू बाबांच्या मांडीवर ऐटीत उभा राहिला आणि एका हाताने बाबांचा खांदा धरून म्हणाला, "आज मी तुम्हाला गोड-गोड पेढे, बर्फी गुलाबजाम देणार आहे.

"हे सर्व खाऊन झालं की, मग तुम्ही खायचा आईस्क्रिमचा मोठा कोन."


"आँ! एवढं सगळं? अरे बंट्या, झोपेत तर नाहीस ना?" बाबांनी आश्चर्यचकित होऊन विचारलं.

आणि पुढे म्हणाले, "हे आहे कुठे सर्व?"
त्यावर बंटू म्हणाला, "असं काय करता बाबा? हे तर सर्व आपल्या घरात आहे."

"काय? घरात? सगळ्यांचा वाढदिवस आजच करायचा ठरवलंय वाटतं?" बाबांना काही कळेना बंटू काय म्हणतो आहे ते.

बाबांनी बंटूच्या आईला हाक मारली.

तिचंही बंटूच्या बोलण्याकडे लक्ष होतचं. पण बंटू आज असं काय बोलतोय हेच तिला कळेना.



बंटूची आई बाबांना म्हणाली, ''आज दुपारी बंटू काही झोपला नाही. घरातच कुठे खेळत होता. आता बहुधा झोपेला आला असावा.''

हे ऐकताच बंटूला खूप राग आला. इतका राग आला, की त्याचं नकटं नाक रागाने लाल-लाल झालं.

तो तक्रारीच्या सुरात बाबांना म्हणाला, ''बाबा, असं हो काय आई म्हणते?''

बाबांनी त्याला जवळ घेतलं. त्याच्या केसांतून हात फिरवला. त्याच्या पाठीवर थोपटलं.


त्याच्या खांद्यावर हलकेच हात ठेवत बाबा म्हणाले, ''बंट्या, तू कधी-कधी असं बोलतोस, की मला काही कळत नाही.''

तेव्हा उत्साहानं पुन्हा बंटू म्हणाला, ''पण बाबा, मी तुम्हाला गंमत सांगितलीच कुठे तर तुम्हाला ती कळणार?''

बाबांनी नुसती मान हलवली.

बंटु पुढे सांगू लागला, ''आज किनई बाबा, मी भिंतीवर दुपारी गुलाबाचं फूल काढलं होतं. पण माझं लक्ष नसताना आईने ते भिंतीवरून काढलं आणि आपल्या डोक्यात घातलं. होय,-अगदी खरं. मी स्वतः पाहिल. आईने भिंतीवरचं फूल काढलं म्हणून मी एक गंमत करायची ठरवलं.

''मी किनई तुमच्या खोलीतल्या भिंतीवर पेढ्यांची, बर्फीची, गुलाबजामची मस्त चित्रं काढली आहेत. आणि हो, मोठ्ठा आईस्क्रिमचा कोन पण काढलाय.



"आता तुम्हांला कधी भूक लागली की आई पटकन तुम्हांला भिंतीवरचा पेढा काढून देईल. किंवा दोन गुलाबजाम काढून देईल. ते तुम्ही खाऊन टाका. आहे की नाही हो गंमत बाबा?"

हे सारं ऐकल्यावर बाबा हसले. अगदी मोकळेपणाने हसले.

बाबा म्हणाले, "व्वा! बंटू व्वा! हे तू फार छान केलंस.

"पण माझीसुद्धा एक गंमत आहे बंटू.


"मला भूक लागली की मी काही एकटा खाणार नाही, तर आपण सगळे मिळून खाऊ. मज्जा मज्जा करू.

"आणि बंटू, तू आज मुद्दाम माझ्यासाठी एवढा खाऊ आणलास. मला खूप खूप बरं वाटलं. अरे आज आपण जेवण झाल्यावर किनई सगळ्यांसाठी आईस्क्रिमचा खरा-खरा कोन आणूया. खाशील ना रे बंटू?"

बंटू ने टुणकन बाबांच्या मांडीवरून उडी मारली आणि धावत धावत आईकडे गेला.

बंटू आईला म्हणाला, "आई, आई, आज बाबा किनई, आईस्क्रिमचा कोन आणणार."

आईने पटकन बंटूला उचलून कडेवर घेतलं आणि आपल्या डोळ्यांतलं पाणी लपवलं.



# बकुळीचं खूळ

मे महिना, म्हणजे उन्हाळ्याची सुट्टी.

आंब्याशी गट्टी, फणसाशी गट्टी आणि अभ्यासाशी मात्र कट्टीच कट्टी.

सुटीत मजा करायची, खेळायचं, भटकायचं आणि खूप काही काही करायचं.

असा हा मे महिना भराभरा संपतो आणि...

जून महिन्यात पावसाळा आणि शाळा एकदम सुरू.

पिंकी इयत्ता पहिलीतून दुसरीत गेली होती.
शाळा सुरू होणार म्हणून पुस्तकंबिस्तकं शोधायला तिने सुरुवात केली होती.

सकाळच्या वेळी शोधाशोध आणि दिवसभर खेळ ह्यातच सारा निघून जाई वेळ.

पिंकूची मैत्रीण सई. दोघीजणी एकाच वर्गात. एकच बाकावर बसायच्या. एकमेकींच्या बाजूला रहायच्या.

दोघी मिळून एकच खेळ खेळायच्या. कधीतरी भांडायच्या पुन्हा भांडण विसरून खेळायच्या, हसायच्या, नाचायच्या, मज्जा मज्जा करायच्या.

पिंकूचा भाऊ बंटू. बंटू तसा लहानच. गोबऱ्या गालांचा. आणि नकट्या नाकाचा.



बंटूला अर्जून नव्हती शाळा.

त्याला फक्त आवडे पावसाळा.

अजून पावसाळ्याला चार-पाच दिवस अवकाश
असल्याने बंटूच्या आईने आपली छत्री शोधून ठेवली होती.

बाबांची छत्री अजून माळ्यावरच होती.

बंटूच्या आईची छत्री मस्तपैकी लाल रंगाची होती. तर बाबांची छत्री
कुट्ट काळी.

पिंकूताई भातुकली खेळताना कधी कधी
आईची छत्री घेई. पिंकू आणि सईची भातुकली अंगणातल्या
झाडाखाली चाले. पण बंटूला मात्र ही छत्री मुळीच
आवडत नसे.

एकदा अशी गंमत झाली.

पिंकू आणि सईची अंगणात भातुकली सुरू होती. पण त्या वेळी छत्रीत बसायला
बंटू काही तयार नव्हता. तो रागावून उन्हातच बसला.

आईने हे पहाताच ती म्हणाली, "अरे बंटू, खेळत जा ताईशी.
उगाच इकडम-तिकडम करू नकोस. उन्हामधे बसू नकोस."

बंटू गाल फुगवून म्हणाला, "ऑई, मला नॉही ती लाल सत्री आवडत."

आईला गंमत वाटली. ती म्हणाली, "का रे बंट्या?"

मग बंटू आपलं नकटं नाक उडवत सांगू लागला, "अग आई,
मघा आम्ही बकुळीच्या झाडाखाली खेळत होतो ना, त्यावेळी
ना, बकुलीची फुलं ना, सत्रीवर पडली. मी सत्रीच्या



आत लपून बसलो होतो ग. मी आतून पाहिलं ना तर मला ती काळी काळी फुलं दिसली ग. मला तर वाटलं, घाणच पडली की काय झाडावरून? मी हळूच डोकावून बाहेर पाहिलं. तर काय गंमत? ती तर माझी बकुळीची फुलं! मला नाही बुवा काळी फुलं आवडत. आणि म्हणून ना, मला नाही ती तुझी सत्री आवडत.''

एवढं सगळं ना थांबता बोलल्यावर बंटूला धाप लागली. आणि त्याचा नाकाचा शेंडासुद्धा चांगलाच लाल झाला. अगदी आईच्या छत्रीसारखा.

आईला ह्या सगळ्याची गंमत वाटली. तिने बंटूला जवळ घेतलं. त्याला समजावत म्हणाली, ''मी सांगते हं ताईला...''

इतक्यात बंटूने टुणकन आईच्या कडेवरून उडी मारली.

आईच्या समोर ऐटीत उभं राहून तो म्हणाला,

''नको ग आई. अग, मी त्यांना असं सांगितलं तर त्याच मला हसायला लागल्या. त्या म्हणतात, बकुळीची फुलं कधी काळी असतात का? मी नाही जा त्यांच्यात खेळणार.''

तरी पण आईने ताईला व सईला हाक मारली.

आईची हाक ऐकताच त्या दोघी उड्या मारतच आल्या.

सई म्हणाली, ''मावशी, मावशी, आम्हाला भातुकली खेळायला खाऊ दे ना ग.''

आई म्हणाली, ''देते की. काय हवंय तुम्हाला?''



पिंकू म्हणाली, "पोहे आणि गूळ दे."

सई म्हणाली, "आणि शेंगदाणेसुद्धा हं."

बंटूला शेंगदाणे खूपच आवडत. शेंगदाण्यांचं नाव ऐकताच बंटू म्हणाला, "आई, मला पण हवेत ग शेंगदाणे."

आई बंटूला म्हणाली, "देईन की. पण एका अटीवर."

बंटू डोळे बारीक करत आणि नाक उडवत म्हणाला, "म्हंजे कॉय?"

आई म्हणाली, "तू ताई-सईशी खेळलं पाहिजेस."

आईचं बोलणं ऐकताच बंटू तोंड वाकडं करणार होता, इतक्यात सई ओरडली, "अय्या पिंकू! आपली गंमत झाडाखालीच राहिली."

आणि गंमत आणण्यासाठी सई-पिंकू सुसाट धावत सुटल्या.

गंमत पहाण्यासाठी बंटूही त्यांच्या पाठोपाठ पळाला.

आईने मुलांना देण्यासाठी फळीवरचा गुळाचा डबा काढला होता. पण ही मुलं अशी धावत सुटली तर कुठे पडतील अशी भीती आईला वाटली. तसाच डबा हातात घेऊन आईसुद्धा मुलांच्या मागोमाग गेली.



ती अंगणात जाऊन पहाते तर काय? सई, पिंकू आणि बंटू हातात हात धरून झाडाखाली फेर धरून नाचत होते. भातुकलीच्या साऱ्या खेळण्यांवर छत्रीची लालम् लाल सावली पडली होती.

आईने जाऊन बंटूला उचलून घेतलं.

बंटूचा अवतार पाहून तिला हसूच आलं.

बंटू खेळातून पळून गेल्यावर सई आणि ताई यांनी बकुळीच्या झाडाखालची सगळी फुलं गोळा केली. ती फुलं काड्यांमधे ओवून त्यांच्या सुगंधी माळा तयार केल्या.


बंटू बाहेर येताच सई-पिंकूनी त्या माळा बंटूला घातल्या. आणि एक मोठी माळ त्याच्या डोक्यावर टोपीसारखी बांधली.

बंटूचा राग तर कधीच पळून गेला.

आई बंटूकडे पहात म्हणाली, "बंट्या, हे कसलं रे बकुळीचं खूळ?"

बंटू म्हणाला, "आम्हांला हवेत दाणे-गूळ!"

आई बंटूच्या गोड उत्तरावर खूष झाली. तीसुद्धा मुलांच्यात खेळायला गेली.



# बंटूची वॉटलबॅग



"आई, आई, आपण पाणी कुठलं पितो ग?"
बंटूने आईला विचारलं.

"नदीचं," आई म्हणाली.

"आणि नदी?"

"झऱ्याचं."

"आणि झरे?"

"पावसाचं."

"आणि पाऊस कुठून येतो?"

"ढगांतून."

"हां हां, म्हणजे आपण सगळे ढगातलं पाणी पितो.
हो ना ग आई?" बंटू म्हणाला.

आई त्यावर फक्त हसली.

बंटू अजून शाळेत जात नव्हता. तसा लहानच होता तो. त्याची घरात सदैव बडबड. आणि निरनिराळे प्रश्न. आई अगदी हैराण होऊन जाई.

पण तरीसुद्धा आईला हे सारं आवडे. उन्हाळ्याच्या दिवसांत जरा चुकून पंखा थांबला तर कसं अस्वस्थ होतं, अगदी तसंच बंटूची बडबड थांबली की आईला वाटे.

बंटूची बहीण पिंकू. ती इयत्ता दुसरीत होती. तिची जुनी पुस्तकं, पेन्सिलींचे तुकडे, रंगीत कागद ही बंटूची मालमत्ता.

आता बंटू लवकरच शाळेत जाणार म्हणून त्याच्या बाबांनी त्याला एक रंगीत चित्राचं पुस्तक आणलं होतं.


बंटू अगदी खूष होता त्या पुस्तकावर. त्या पुस्तकातील शेंडीवाला भटजी, पळणारं हरीण, लालेलाल पतंग, हिरवंगार कणीस, धनुष्यबाण, ही चित्रं त्याला खूप आवडत. ताईच्या पुस्तकापेक्षा आपल्या पुस्तकात खूप चित्रं आहेत म्हणून बंटूला ते पुस्तक खूप आवडे.

परवा काय झालं, ताई शाळेत जायला निघाली तेव्हा तिला तिचं पुस्तक मिळेचना. ताई लागली रडायला. सगळीकडे लागली शोधायला. सगळीकडे लागली पहायला. घरभर लागली धावायला. जोरात लागली ओरडायला. पण काहीच उपयोग नाही. आता काय करायचं? शाळेत तर पुस्तक नेलंच पाहिजे. नाहीतर पट्ट्या मिळतील.

पिंकूताई रागारागातच बंटूला म्हणाली, "काय रे बंट्या, माझं अभ्यासाचं पुस्तक घेतलंस का? खरं सांग बरं."

बंटू पिंकूला चिडवत म्हणाला, "हँ, हँ, नीट पहायला काय होतं? मला माहीत आहे, पुस्तक कुठे आहे ते. पण मी नाही सांगणार. तू मला बंट्या का म्हणालीस? आपल्या लहान भावाला का कधी चिडवतात?"

पिंकूताई हसत म्हणाली, "बरं, बरं, माझ्या लहान भावा,



आता नाही तुला चिडवणार. पण आता सांगशील ना कुठंय ते?''

बंटू ऐटीत म्हणाला, ''ते काय तिकडे टेबलावर. अग ताई, बाबांनी किनई काल रात्री त्याला कव्हर घातलंय. म्हणून तुला ते ओळखता आलं नाही. आहे की नाही गंमत? ताईची फजिती, ताईची फजिती!''

आता मात्र पिंकूताईला राग आला. ती म्हणाली, ''अजून शाळेत जात नाहीस आणि माझी फजिती करतोस?''

मग ताईने टेबलावरचं पुस्तक खसकन घेतलं आणि दप्तरात कोंबलं. बाकीची वह्या-पुस्तकं दप्तरात भरली. पाण्याची बाटली घेतली. दप्तराजवळ ठेवली. आणि ती जेवायला पळाली.

बंटू हे सगळं कोपऱ्यात उभं राहून पहात होता. ताईची घाई. ताईचं दप्तर. ताईची पुस्तकं आणि ताईची पाण्याची बाटलीसुद्धा-बंटूला वाटलं, आपल्याकडे ताईसारखी पुस्तकं आहेत. छोटंसं रंगीत दप्तर आहे. पण पाण्याची बाटली काही नाही. आज संध्याकाळी बाबा घरी आले की त्यांना सांगू, मलाही ताईसारखी पाण्याची बाटली हवी. मग मी शाळेत जाऊन अभ्यास करीन. दुपारच्या सुट्टीत डबा खाऊन पाणी पिईन.

बंटू दुपारपासून विचार करत होता. कुठल्या रंगाची पाण्याची बाटली घ्यावी बरं? ताई तर पाण्याच्या बाटलीला 'वॉटलबॅग' म्हणते. आपणही तसंच म्हणायचं.



एकदा त्याला वाटलं, गुलाबाच्या फुलासारखी लाल लाल रंगाची वॉटलबॅग घ्यावी. पण नको. त्यापेक्षा सूर्यफुलासारखी पिवळी पिवळी की आकाशासारखी निळी निळी? बंटूचं काही नक्की ठरेना. एकदा हा रंग बरा वाटे तर एकदा तो रंग.

खूप वेळ बंटूचा काही आवाज नाही म्हटल्यावर आई बंटूला शोधू लागली.

आणि आई पहाते तर काय, बंटू मनाशीच बोलत, हातवारे करत, खुर्चीत पसरला होता.


"काय रे बाळा? काय करतोस?" आईने असं विचारताच बंटू लाजला आणि पटकन अंगणात पळाला.

अंगणात झाडाखाली बसून आकाशात पहात बंटू एकदम ओरडला, "डिंग डाँग, डिंग डाँग. एक गंमत आठवली. डिंग डाँग, डिंग डाँग. वॉटलबॅग मिळाली."

बंटूचा आवाज ऐकून आई पटकन बाहेर धावत आली. पहाते तर, बंटू झाडाभोवती गोल गोल फेऱ्या मारतो आहे. आणि बंटू झाडाला सांगत होता,

"अरे बकूळ, बकूळ, अरे मी वॉटलबॅग आणली ना की मी तुलाही त्यातलं थोडं पाणी देईन हं.

आपण दोघं पिऊ पाणी
मजेत गाऊ गोड गाणी
पाणी पिऊन नाचतील मुलं
भराभरा फुलतील फुलं."



बंटूचे खेळ पाहून आई हसतच घरात गेली.

संध्याकाळी बाबा घरी आले तेव्हा बंटू दारामागे लपून बसला होता. पण त्याअगोदरच बाबांनी बंटूला पाहिलं. आपली गम्माडी बाबांना कळली म्हणून बंटू गाल फुगवून कोपऱ्यात जाऊन उभा राहिला. तो बाबांवर रुसला होता. बाबा खुर्चीत बसत म्हणाले, "काय रे बंटू, तुझे गाल कसे काय फुगले बुवा? गालांत काय लाडूबिडू आहे की काय? अरे, आज मी तुला एक गंमत आणली होती, पण तुझ्या तोंडात तर लाडू आहेत. मग तू गंमत कशी खाणार? थांब, मी ताईलाच देतो."

बाबांनी गंमत आणली आहे म्हणताच बंटूचा राग पळून गेला.


"गंमत गंमत, जंमत जंमत, मला मला पाहिजे" - असं म्हणत बंटू बाबांकडे धावला.

बाबांनी त्याला जवळ घेत विचारलं, "काय झालं तुला रागवायला?"

बंटू म्हणाला, "आता मी मोठ्ठा होणार. शाळेत जाणार. म्हणून मला एक मोठ्ठी वॉटलबॅग पाहिजे." आणि बंटू पुढे म्हणाला, "बाबा, वॉटलबॅग म्हणजे काय माहीत आहेत तुम्हाला? वॉटलबॅग म्हणजे पाण्याची बाटली, बरं."

बाबा हसत म्हणाले, "असं होय. मला माहीतच नव्हतं. अगदी आजच कळलं मला रे. पण बंटू, आपण तुला अगदी मोठ्ठी मोठ्ठी वॉटरबॅग आणू. तुला कुठल्या रंगाची हवी बरं?"

बंटू पटकन म्हणाला, "मला किनई काळ्या रंगाची वॉटलबॅग हवी आहे. काळ्या."



"काळ्या?" बाबा तर एकदम ओरडलेच. म्हणाले, "बंटू,तू मला हल्ली फार कोड्यात टाकतोस बुवा! नीट सांग बघू काय ते."

बाबा ओरडलेले पहाताच बंटू हसू लागला.

बंटू बाबांच्या मांडीवर बसत म्हणाला, "बाबा, तुम्हाला काही कळतच नाही बुवा. सगळ्यात मोठी वॉटलबॅग काळ्या रंगाची असते. ओळखा बघू कुठली? सांगा ना लवकर. मला माहीत आहे. सांगा, सांगा."

बाबांनी खूप डोकं खाजवलं म्हणाले, "हरलो बुवा. तूच सांग."

बंटू चटकन ओरडला, "ढग. अहो ढग ही आपल्या सगळ्यांची वॉटलबॅग नाही का? मला ढगासारखीच वॉटलबॅग हवी."


हे बंटूचं उत्तर ऐकून बाबा इतके हसले, इतके हसले की बंटूला वाटलं, जसा काही ढगांचा गडगडाटच होतोय.

बाबांनी बंटूला थोपटलं. हसून हसून त्यांच्या डोळ्यांत पाणी आली होतं. ते पुसत बाबा म्हणाले, "बंटू, तू शाळेत जा, खूप खूप अभ्यास कर आणि खूप खूप मोठा हो..."

त्यावर बंटू पटकन म्हणाला, "हो, पण खूप खूप मोठी मोठी वॉटलबॅग घेऊन. हो ना बाबा?"

बाबा म्हणाले, "अरे हो रे हो."आणि त्यांनी बंटूला अलगद उचलून घेतलं.

आनंदाने बंटू ढगासारखा हलका झाला होता. बंटू बाबांच्या खांद्यावर ढगासारखा तरंगू लागला.



# मुलांचा बाप्पा, मुलांशी गप्पा

गणपती जवळ आले की घरात धामधूम सुरू होते. घरातला एक कोपरा खास गणपतीबाप्पासाठी राखून ठेवलेला असतो. आईची आवराआवर तर बाबांची साफसफाई सुरू होते. मग सजावटीसाठी बाबा रंगीबेरंगी कागद आणतात. आई फराळाचं करते. मुलं आई-बाबांच्या मदतीला लागतात. घरी येणाऱ्या नव्या पाहुण्यासाठी सारं घर राबायला लागतं.

बंटू आणि पिंकू यांच्या घरीसुद्धा अगदी असंच व्हायचं. बाबांनी कागद आणले की ते कापायला, चिकट-वायला बंटू, पिंकू मदत करत. फराळाचं करण्यासाठी पिंकू आईला मदत करी. फराळाचं खाण्यासाठी बंटू स्वयंपाक-घरात घिरट्या घाली.

गोबऱ्या गालांचा, नकट्या नाकाचा बंटू तसा लहानच होता. अजून शाळेत जात नव्हता.

बंटूची पिंकूताई मात्र खूपच मोठ्ठी होती. पिंकू इयत्ता दुसरीत होती.

ह्या वर्षी बंटू आणि पिंकू यांनी गंमत करायची ठरवली. नेहमीप्रमाणे बाबांनी रंगीत कागद आणले तरी बंटू कोपऱ्यात जाऊन बसला. गाल फुगवून. तर पिंकू जाऊन खिडकीत उभी. बाबांना काही कळेचना. नेहमी घरात नाचणारी, उड्या मारणारी, हसणारी, खेळणारी ही मुलं. आता असं काय करतात बुवा? ही मुलं रागावली का? ही मुलं रुसली का?



बाबांनी हळूच बंटूला हाक मारली.

बंटू हळू हळू चालत आला. गाल फुगवून म्हणाला, ''बॉबा बॉबा, ह्या वर्षी किनई, मी आणि ताई, सगलं सगलं 'डेलोकेशन' करणार. तुम्हीच आम्हाला मदत करायची.''

बाबा हसायला लागले.

तेव्हा बंटू आपलं नकटं नाक उडवत म्हणाला, ''बाबा, बाबा, हसता का हो? माझ्या अंकलिपीत, पहिल्या पानावर पहिलं चित्र गणपतीबाप्पाचं आहे. तुमच्या पुस्तकात कुठंय त्याचं चित्र? बाप्पा आम्हा मुलांचा आहे. म्हणून आम्हीच ते 'ते... ते... ते...' करणार.''

बाबा म्हणाले, ''म्हणजे बंटू, डेकोरेशन ना रे?''
बंटूचा राग पळाला. तो बाबांच्या मांडीवर बसत म्हणाला, ''हां हां तेच. मला ताईने सांगितलं होतं. पण मी विसरलोच तो शब्द.''

आई स्वयंपाकघरातून सारं ऐकत होती. ती बंटीच्या बाबांना म्हणाली, ''अहो, मुलं करत आहेत तर करू देत की, त्यांनाही वाटतं आपण काम करावं. छान छान सजावट करावी. आपल्या मित्र-मैत्रिणींना दाखवावी.''

आईची परवानगी मिळताच बंटू-पिंकूनी आनंदाने उंच उड्याच मारल्या. आणि त्यांनी रंगीत कागदांचा ताबा घेतला. त्यांच्या घरी एक छोटंसं लाकडी मखर होतं. पिंकू म्हणाली, ''आपण त्याच्यावर कागद चिकटवू.'' पण



कापायचं कसं? माप कसं घ्यायचं? बंटू-पिंकू बसले विचार करत.

इतक्यात बाबा आले. म्हणाले, " चला मुलांनो. सगळं काम तुम्ही करायचं, मदत लागली की मला बोलवायचं."

बाबांनी त्यांना व्यवस्थित माप घेऊन छानपैकी कागद कापून दिले. कागद पहात बंटू म्हणाला, "बापरे! ताई, हे कागद एकाच बाजूने रंगीत आहेत आणि दुसऱ्या बाजूने मात्र पांढरे, आता काय करायचं ताई?"

पिंकूताई म्हणाली, "अरे बंट्या, तुला माहीत नाही. हे कागद असेच असतात. अरे, आमच्या शाळेत हस्तकला शिकवतात ना, त्या वेळी सुद्धा असेच कागद असतात रे."


बंटू लगेच म्हणाला, "अग ताई, आपण जर हे कागद चिकटवले ना, तर लोकांना रंग दिसतील, पण बाप्पाला मात्र फक्त पांढराच रंग दिसेल."

"मग काय करायचं?" पिंकू म्हणाली.

"काहीतरी आयडिया सांग ना." बंटू म्हणाला. आणि बंटू-पिंकू विचार करू लागले. काय करावं बरं? दोघांनाही कळेना.

इतक्यात बंटूने टुणकन उडी मारली. बंटू दोन्ही हात उंचावत ओरडला, "मिळाली आयडिया!! गंमतजंमत करूया. रंगीत चित्रं काढूया."

बंटू आणि पिंकूकडे एक लाल-निळी पेन्सिल होती. म्हणजे एका बाजूने लाल रंग आणि दुसऱ्या बाजूने निळा रंग.



बाबांनी ती दोघांना दिली होती. पिंकूने लगेच आपल्या दप्तरातून पेन्सिल काढली. बंटू, पिंकू आळीपाळीने रंगीत कागदाच्या मागच्या बाजूला चित्रं काढू लागली.


बाबा मधेच एकदा डोकावून गेले. त्यांना कळेना, हे काय चाललंय?पण आई म्हणाली, ''अहो राहू दे. मुलं जे काही करताहेत ते त्यांना करू दे. अहो मुलंच ती. आपल्यापेक्षा नक्कीच चांगली सजावट ती करतील बघा.''

बाबांनाही आईचं म्हणणं पटलं. ते हसत दुसऱ्या कामासाठी निघून गेले.

चित्रं काढण्यात बंटू आणि पिंकू इतके रंगून गेले की, त्यांना जेवायची पण आठवण राहिली नाही. ती दोघं काम करण्यात अगदी तल्लीन झाली होती. आई-बाबा लांब बसून त्यांची गंमत पहात होते.

चित्रं काढून सगळे कागद संपल्यावर बंटूने भराभर कागदाच्या कडांना गोंद लावला. पिंकू पटापट ते चिकटवू लागली. हे त्यांचं काम संपेपर्यंत रात्र खूप झाली.

तेवढ्यात बंटू म्हणाला, ''पिंकूताई, आपण आपली पेन्सिल बाप्पाला द्यायची का ग?'' पिंकू म्हणाली, ''हो... हो... हो...'' त्याबरोबर त्या दोघांनी ती पेन्सिल ती पेन्सिल मखरात ठेवली. आता सगळं कसं छानपैकी झालं होतं. दोघांनी हात जोडले.



बंटू म्हणाला, "आता ये रे गणपतीबाप्पा. आम्ही कसं छान सजवलंय बघ तुझं घर. आवडलं ना रे तुला?"

आणि खरंच, खराखुरा गणपतीबाप्पा मखरात येऊन बसला. पिंकूचे डोळे बंद होते.

बंटू ओरडला, "अग ताई, डोळे उघड. तो बघ बाप्पा आला."

"अय्या, खरंच की." ताई डोळे उघडत आश्चर्याने म्हणाली.

गणपतीबाप्पा हसत म्हणाला,


"मुलांनो,तुम्ही केलेली सजावट मला खूप खूप आवडली. मी तुमचाच आहे रे. आणि म्हणून सजावटदेखील तुम्हीच केली पाहिजे बरं. अरे माझ्या लाडक्या मुलांनो, मोठी माणसे सजावट करतात ती लोकांसाठी. माझ्यासाठी नव्हे. पण तुम्ही केलेल्या सजावटीमुळे आणि खास माझ्यासाठी काढलेल्या चित्रांमुळे, सुंदर सुंदर चित्रांमुळे, मी तुमच्यावर खूष झालो आहे.
"आणि हो, तुम्हाला एक खास गंमत सांगायला तर मी मुद्दामहून इथे आलो आहे."

गंमत म्हणताच बंटू, पिंकू ओरडू लागले. त्यावर गणपतीबाप्पा म्हणाला,


"अरे ओरडू नका रे. मी इथे आल्याचं कळलं तर खूप गर्दी होईल रे. आणि मी लवकर तुमच्याकडे आलो म्हणून मला माझी आईसुद्धा ओरडेल हं!!"

पिंकू म्हणाली, "अय्या! तुला पण तुझी आई ओरडते बाप्पा?"

बाप्पा फक्त हसला आणि गंमत सांगू लागला,



"मुलांनो,तुम्हांला माहीत आहे का? जगातलं सर्वात उंच शिखर हिमालयात आहे. त्याचं नाव एव्हरेस्ट. हे एव्हरेस्ट २९ मे १९५३ रोजी शेर्पा तेनसिंग नोर्के आणि एडमंड हिलरी ह्या दोघांनी प्रथम सर केलं. तेनसिंगने तिथे देवासाठी थोडी मिठाई ठेवली. आणि आणखी पण एक गंमत ठेवली. काय माहीत आहे का?"



बंटू म्हणाला, "नाही बुवा आम्हांला माहीत."
गणपतीबाप्पा पुढे बोलू लागला,

"अरे मुलांनो, ह्या तेनसिंगला दोन छोट्या-छोट्या, गोड-गोड मुली होत्या. त्यांची नावं पेमा आणि निमा. जेव्हा ह्या पेमा-निमाला कळलं की आपले बाबा एव्हरेस्टवर जाणार आहेत,तेव्हा त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी आपल्याजवळची, आपली आवडती वस्तू बाबांना दिली आणि म्हणाल्या, बाबा, तुम्ही एव्हरेस्टवर गेलात की आमची आठवण म्हणून ही वस्तू तिथे ठेवा. मुलांनो, ती मूल्यवान वस्तू म्हणजे, एक छोटीशी लाल-निळी पेन्सिल होती. आज माझ्या मखरात ही तुम्ही मला दिलेली पेन्सिल पहाताच, मला ह्या गोष्टीची आठवण झाली. एखादी वस्तू किती मोठी आहे ह्याला किंमत नाही मुलांनो. एखादी वस्तू आपण किती प्रेमाने देतो, किती मनापासून देतो ह्याला महत्त्व आहे. माझ्या लाडक्या दोस्तांनो, तुम्ही मला ही पेन्सिल मनापासून प्रेमाने दिलीत. मला खूप खूप आनंद झाला."

इतकं बोलून बाप्पा थांबला.

तेव्हा बंटू लाजत म्हणाला, "बाप्पा, बाप्पा, तू मोदक खाणार का? तू उद्या घरी येणार म्हणून आईने तुझ्यासाठीच करून ठेवले आहेत."
गणपतीबाप्पा हसला आणि म्हणाला,

"अरे माझ्या लाडक्यांनो, माझं घर सजवताना, तुम्ही तुमचं जेवणखाण विसरलात. आता आणखी उशीर करू नका. जा बघू जेवायला. हां, आता दोघांनी डोळे बंद करा बघू. मला घरी गेलं पाहिजे. आई हाका मारतेय रे मला."

बंटू आणि पिंकूने डोळे बंद केले. त्याचबरोबर एवढा वेळ गप्पा मारणारा गणपतीबाप्पा अदृश्य झाला.

लांब बसून आई-बाबा हे सारं पहात होते. पण त्यांना काही गणपतीबाप्पा दिसत नव्हता हं.


बंटू आणि पिंकू यांनी डोळे बंद करताच आई म्हणाली, "अरे उठा आता. छान झालीय सजावट. चला आता जेवायला. मी आणि बाबासुद्धा तुमच्यासाठी जेवायचे थांबलो आहोत."

बंटू बाबांना म्हणाला, "बाबा, बाबा, आता किनई, गणपतीबाप्पा आला होता. तो म्हणाला..."

इतक्यात त्याला उचलून घेत बाबा म्हणाले,

"मला माहीत आहे. तो म्हणाला असेल, बंटू आणि पिंकीचं 'डेलोकेशन' मला खूप खूप आवडलं."

# गंमत्




काल पिंकू शाळेत गेली तेव्हा चांगलंच ऊन पडलं होतं. अगदी सोनेरी-सोनेरी. उड्या मारतच ती शाळेत गेली. आणि शाळा सुरू झाली.

मधली सुट्टी झाली. आणि आकाशात ढगांची गर्दी होऊ लागली. आकाशात ढगांचे काळे काळे किल्ले तयार झाले. हळूहळू ह्या किल्ल्यांची एक भिंतच् तयार झाली. ह्या काळ्या-काळ्या भिंतीमागे सूर्य जाऊन लपला. गार गार गारवा मग झोंबू लागला.

पाऊस येणार, पाऊस येणार - आता की मग?

साऱ्याच मुलांची मग होऊ लागली तगमग.
इतक्यात पावसाची रिमझीम सुरू झाली. मुलं मग तालात, हळूच गालांत गाणं गाऊ लागली.

आज पावसात भिजत, पाण्यात खेळत घरी जायला मिळणार म्हणून सारीच मुलं खूष होती. भरपूर पावसाची गाणी म्हणत होती.

मुलांच्या हाका ऐकून, मुलांची गाणी ऐकून पावसाचा जोर वाढला.

शाळा सुटताना तर सपाटून पाऊस आला.

पण सगळ्याच मुलांना काही भिजायला मिळालं नाही.

कारण काही मुलांचे पालक छत्र्या, रेनकोट घेऊन शाळा सुटण्याच्या वेळेला आले होते. ज्या मुलांचे पालक आले होते, ती बिचारी मुलं मात्र भिजत-भिजत,नाचत-नाचत, उड्या मारत, आनंदात घरी गेली.

पिंकूची आई आली नव्हती. पिंकू खुशीत. सईची आई आली नव्हती. सई पण मजेत. सई, पिंकू एकमेकांच्या मैत्रिणी. त्या दोघींनी आपापली दप्तरं घेतली, पाठुंगळीला मारली आणि निघाल्या. मजेत, आरामात पावसात भिजत त्या घराकडे निघाल्या.

एखादवेळेस वाटेत आई भेटेल म्हणून त्या दोघी नेहमीच्या रस्त्याने न जाता जरा लांबच्या रस्त्याने गेल्या. तेवढंच पावसात जास्त वेळ भिजायला मिळेल ही गंमत!

एका झाडाखाली पावसाच्या पाण्याचं एक डबकं झालं होतं. त्यात दोनतीन चिमण्या आपले पंख फडफडावत होत्या. सईला मोठी गंमत वाटली. सई चिमणीला म्हणाली, काय ग, एवढा पाऊस पडला, तेव्हा का नाही आंघोळ केलीस? आता ह्या इवल्याशा तळ्यात का नाचतेस?''

चिमणी म्हणाली, ''अग सई, पावसाचं पाणी आम्ही प्यायला आणि तळ्यातलं पाणी आंघोळीला वापरतो.''

त्यावर पिंकू म्हणाली, ''पण चिऊताई, असं का?''

पिंकूचा प्रश्न ऐकून चिमणी हसतच राहिली. खूप चिवचिवाट करून चिमणी म्हणाली, ''अग मुलींनो, रोज सकाळी



उठल्यावर तुम्ही आंघोळ करता किनई? तरी पण तुम्हांला असं पावसात भिजायला आवडतं किनई? बस्स! आमचंही अगदी तसंच आहे.''

सई-पिंकूला हे उत्तर पटलं. इतक्यात झाडावरून एक आवाज ऐकू आला, ''ए, मी सांगू?''

चिमणीसकट सगळ्यांनी वर पाहिलं. उंच फांदीवरच्या घरट्यातून चिमणीचं पिल्लू डोकावून म्हणालं, ''पण आम्हांला आई कधी भिजायला देत नाही. नुसतं बसून बसून आणि दाणे खाऊन आम्हांला आलाय कंटाळा. आज आम्हीसुद्धा भिजणार.''





त्यावर चिमणी रागावून पिल्लांना म्हणाली, ''आत बसा पाहू घरट्यात. उगाच भिजाल आणि आजारी पडाल.''

पण चिमणीची पिल्लं काही ऐकेनात. ती म्हणाली, ''मग सई आणि पिंकू कशा भिजतात? त्या पण आमच्या मैत्रिणीच आहेत.'' ''त्या दोघी मोठ्या आहेत. त्या शाळेत जातात. तुम्ही शाळेत जाऊ लागलात की हळूच एकदा भिजा. ह्या सई-पिंकूसारखं!''

हे पिल्लांना पटलं आणि ती चिमणीची पिल्लं चिं चिं करत घरट्यात जाऊन बसली.

चिमणीला टाटा करून सई-पिंकू घरी गेल्या.

दारातच उभं राहून आई वाट पहात होती. लांबच्या रस्त्याने घरी आल्याने त्यांना यायला उशीर झाला म्हणून आई काळजीत होती. गंमत म्हणजे पाऊस फक्त शाळेजवळच पडला होता. घराजवळ तर ऊन पडलं होतं.

त्यामुळे सई, पिंकू यांना भिजलेलं पहाताच आई चटकन बावरलीच.

आईच्या पाठी लपलेला पिंकूचा लहानगा भाऊ बंटू म्हणाला, "आई, आई, मी पण भिजणार. पिंकूताई कशी भिजली ग?"

आईने बंटूला हलकासा धपाटा दिला आणि पिंकूला जवळ घेतलं.

सई आपल्या घरी पळाली.


आईने पिंकूचे ओले कपडे बदलले. तिचं डोकं खसाखसा पुसलं. आणि असं भिजलं म्हणून चांगला दमही दिला. बंटूला धपाटा मिळाला असला तरी त्याची काहीतरी धुसफूस चालूच होती. तो कोपऱ्यात रुसून बसला होता. मग आईने बंटूला जवळ घेतलं. तरी बंटू रागावलेलाच होता. तो काही आईशी बोलेना. तो काही हसेना. तो काही आईकडे पाहीना. मग आईनेही गंमत करायचं ठरवलं.

आई म्हणाली, "बंटू,लाडू खाणार का? "

बंटू हसेना. "बंटू, चॉकलेट खाणार का?"
बंटू काही पाहीना.

इतक्यात बंटूचे बाबाच घरी आले.

बाबा घरी आले हे पहाताच आई पटकन उठली. बाबा येऊन खुर्चीत बसले. बंटू लगेच बाबांच्या



मांडीवर चढून बसला. रागावल्याने, रुसल्याने बंटूचा चेहरा गोलम गोल झाला होता. बंटूचं नकटं नाक तर रागाने लाल झालं होतं.

बंटूचा हा अवतार पहाताच बाबांनी ओळखलं की बंटूचं काहीतरी बिनसलंय.

''बाबा,बाबा, मला किनई, ऑई किनई, भिजॉयला देतच नाही. ''बंटू भुणभुणला.

बाबांना नीटसं कळलंच नाही.

इतक्यात आई बाबांसाठी गूळ-पाणी घेऊन आली. तेव्हा गूळ खाऊन पाणी पीत बाबा आईला म्हणाले, ''उद्या रविवार. मला सुट्टी आहे. उद्या आपण सर्व जण बंटूला भिजवूया.''

आपण भिजलो म्हणून बंटू आपलं नाव बाबांना सांगेल, मग बाबा आपल्याला रागवतील असं समजून पिंकू दारामागे लपून बसली होती. बंटूला सगळ्यांनी भिजवायचं असं बाबांनी म्हणताच पिंकू पटकन दारामागून बाहेर आली. पिंकू ओरडून म्हणाली, ''हो हो बाबा! आपण सगळेच जण त्याला भिजवूया. चांगलं गार गार पाण्याने भिजवूया. चांगली मज्जा येईल बंट्याची.''

ताई असं बोलताच बंटू घाबरला. बापरे! आपल्याला सगळ्यांनी भिजवलं तर? आणि ते पण गार गार पाण्याने. बंटू घाबरून बाबांना बिलगून बसला.



तेव्हा बाबा त्याला थोपटत म्हणाले, "अरे बंट्या, असं रे काय करतोस? भिजवायचं म्हणजे काय ते माहीत आहे का? अरे, उद्या तुला सुगंधी तेल लावून मालीश करू. उटणं लावून आंघोळ घालू. चांगल्या ऊन-ऊन पाण्याने. तू आंघोळ करताना ताई फटाके वाजवेल. मग तू बाप्पाला नमस्का कर. मग आम्ही सर्व तुला एक गंमत देऊ. का माहीत आहे का? अरे, उद्या तुझा वाढदिवस! विसरलास वाटतं बंटोबा?"


बंटूचा राग तर पळून गेलाच. पण आईने लाडू-चकल्या का करून ठेवल्यात ते आता त्याला कळलं आणि बंटू आनंदाने, लाडात येऊन गाल फुगवून ओरडला, "आँई, मला दॉन लॉडू पॉहिजेत."

आणि सारेच हसू लागले.



# बंटूचा मित्र

सकाळी बाबांची कामावर जाण्याची धावपळ तर पिंकूताईची शाळेत जाण्याची धांदल. सकाळी आईला बंटूकडे लक्ष द्यायला अजिबात वेळ नसे. ह्या सकाळच्या घाईच्या वेळी बंटूची काही वेगळीच कामं चालत. सगळी जणं घाईत असल्याने बंटूला व्यवस्थित वेळ मिळे. त्याची कामं म्हणजे, बाबांच्या खणात आपल्याला खेळण्यासाठी कुठली वस्तू आहे का ते हळूच पहाणं. पिंकूताई जेवायला बसली की तिच्या बॅगेतील चॉकलेटच्या चांद्या, रंगीत खडूचे तुकडे पळवणं. आणि कोणाचं लक्ष नसताना बंटू कॉटवर चढे, अन् टाचा उंचावून हळूच रेडिओ सुरू करे आणि पटकन बंद करे. कारण रेडिओला हात लावला तर बाबा ओरडत असत.




एकदा असंच खेळता खेळता बंटूला रेडिओ-खाली ठेवलेलं एक मोराचं पीस मिळालं. बंटूला कळेना, कुठल्या मोराचं असेल बर हे पीस? तो धावत आईकडे गेला. आई होती घाईत. आई होती गडबडीत.

तो आईला म्हणाला, "आई, आई, हे पीस कुणाचं आहे ग?"

आई म्हणाली, "मोराचं."

बंटू गाल फुगवून, रागावून म्हणाला, "अग, ते मला माहीत आहे ग. पण कुठल्या मोराचं?"

त्यावर पिंकूताई बंटूसारखेच

गाल फुगवून म्हणाली, "व्वा रे बब्बड! म्हणे कुठल्या मोराचं? असं कधी कळतं कां?" आणि ताईने चांगली लांब जीभ काढून बंटूला वेडावून दाखवलं.

मग आईने ताईकडे पहात डोळे मोठे केले आणि बंटूला समजावत म्हणाली, "अरे तो अंगणात मोर आला आहे ना, त्याचं आहे ते पीस."

हे ऐकताच बंटू अंगणात धूम पळाला.


बंटू अंगणात आला आणि पहातो तर काय,
खरंच, एक मोर बंटूची वाट पहात होता. अंगणात झाडाखाली ऐटीत उभा होता. बंटूला पहाताच तो खुदकन हसला. आपल्या डोक्यावरचा तुरा तुरूतुरू हलवत तो बंटूकडे आला. मोराचा चकचकीत निळा रंग, डौलदार रंगीबेरंगी पिसारा, चालताना टुकूटुकू हलणारी बाकदार मान पाहून बंटू खूष झाला.


बंटू म्हणाला, "अरे मोरा, मला किनई तुझं एक पीस मिळालंय. हवंय तुला?"

मोर हसला.म्हणाला, "अरे वेड्या, मी ते तुझ्यासाठीच ठेवलं होतं, रेडिओच्या खाली. हो किनई?" बंटू हसला पण रागवला, आणि म्हणाला, "पण तू मला वेडा का म्हणतोस?"

मोर प्रेमाने हसला. त्याने आपल्या पिसाऱ्याने बंटूला थोपटलं. त्याबरोबर बंटूचा सगळा राग निघून गेला.

मोर बंटूला जवळ घेत म्हणाला, "अरे बंटू, तू किती छान नाचतोस, म्हणून ते पीस मी तुला बक्षीस दिलंय. आवडलं ना तुला?"





बंटूला कळेना, आपण नाचतो ते ह्याला कसं कळलं? बंटूकडे पहात मोर म्हणाला,

''थांब सांगतो, मला कसं कळलं ते. अरे काल दुपारी आई झोपल्यावर, हळूच कॉटवर चढून तू रेडिओ सुरू केलास. त्यावेळी रेडिओवर, ''नाच रे मोरा आंब्याच्या वनात, नाच' हे गाणं लागलं होतं. हे गाणं ऐकताच तू आमच्यासारखा नाचू लागलास. गाणं संपलं तरी तुझा नाच काही संपेना. मी खिडकीतून पहात होतो. इतक्यात आईला जाग आली. आणि रेडिओ लावला म्हणून तुला ती ओरडली. मला खूप खूप वाईट वाटलं. पण तुझा नाच मला खूप खूप आवडला. आणि म्हणूनच मी जाताना हळूच एक माझं पीस तुझ्यासाठी ठेवलं. माझी आठवण म्हणून.''

हे ऐकल्यावर मात्र बंटू सुखावला. अगदी अगदी खूष झाला.

तो काहीतरी बोलणार इतक्यात मोरच बंटूला म्हणाला, ''अरे बंटू तुला एक गंमत सांगायची राहिलीच की. ती सांगायला तर मी मुद्दामहून आलो होतो.'' ''कुठली गंमत? कुठली गंमत? सांग ना लवकर - '' असं म्हणत बंटू उड्या मारू लागला. मोराभोवती नाचू लागला.

मोर म्हणाला, ''अरे हो, हो, सांगतो सांगतो. किती उड्या मारशील? अरे बंट्या, ते पीस आहे ना, ते आहे जादूचं.''

''जादूचं पीस'' असं जोराने ओरडत बंटूने आनंदाने मोराच्या गळ्याला मिठीच मारली. आणि आनंदाच्या भरात बंटू गाणंच म्हणू लागला,



''जादूचं पीस मिळालं मला, गोड गोड खाऊ देईन तुला.
पीस आहे जादूचं, छान छान रंगांचं.
ह्या पिसाची गंमत एक - झाडावरून खाली फेक.
पीस जाईल उडत उडत मोर येईल पळत पळत.
हो किनई रे मोरा?''



''हो, अगदी खरं.''मोर म्हणाला
आणि पुढे सांगू लागला, ''तुला जर कधी माझी आठवण आली तर झाडावरून हे पीस हळूच खाली सोड. ते वाऱ्यासोबत उडत उडत येईल माझ्याकडे आणि मी येईन पळत-पळत तुझ्याकडे. पण बंटू, आपली ही गंमत कुणाला सांगायची नाही बरं. जर तू कुणाला सांगितलंस ना, तर ह्या पिसातली जादू लगेच निघून जाईल. अच्छा बंटू, मी जातो. अच्छा...'' असं म्हणत मोर निघून गेला.

बंटू अंगणात उभा राहून मोराला अच्छा करत होता. इतक्यात बाबा आले. ते ऑफिसला निघाले होते. त्यांना वाटलं, बंटू आपल्यालाच टाटा करतोय. ते म्हणाले, ''बंटू, अच्छा, टाटा.''

बंटू ही म्हणाला, ''अच्छा बाबा.''

तो हसत उड्या मारत घरी आला.
त्याने ते जादूचं पीस आपल्या खणात ठेवून दिलं. त्याची आणि मोराची गंमत होती ती.

संध्याकाळी बंटूला मोराची आठवण आली. लगेच त्याने आपला खण उघडला. पण पहातो तर काय, त्यात जादूचं पीस नव्हतंच. आँ? गेलं कुठे? बंटूला काही कळेना. त्याने पळत जाऊन आईला विचारले, ''माझं, मोराचं पीस कुठे गेलं ग?''

हे ऐकताच आई म्हणाली, ''अरे ती गंमतच झाली. तू दुपारी जवून झोपला होतास त्या वेळी मी घर आवरत होते. तेव्हा खूप वारा सुटला होता. मी तुझा खण उघडला त्या वेळी एक मोराचं पीस त्यातून बाहेर उडालं आणि अंगणात गेलं. मी ते उठून आणणार इतक्यात, ते एका चिमणीनेच पळवलं बघ.''

हे ऐकताच बंटू रडू लागला. तेव्हा आई बंटूला जवळ घेत म्हणाली, ''अरे रडतोस काय? मी बाबांना सांगितलं की ते तुला दोन छान मोरपिसं आणून देतील, मग तर झालं ना? आता रडू नकोस बरं.''

बंटू डोळे पुसत म्हणाला, ''आई मला तेच पीस हवं आहे ग. ते किनई जादूचं पीस होतं. अगदी खरं.''

आई म्हणाली, ''कुठली जादू?''

बंटू म्हणाला, ''मी नाही सांगणार तुला. ती माझी आणि मोराची गम्माडी आहे फक्त.''

आईने बंटूला जवळ घेतलं. बंटूला थोपटत ती म्हणाली, ''झोप रे राजा माझ्या. अर्धवट झोप झाली की तुला गमती दिसायला लागतात.''

बंटू डोळे मिटून आईच्या मांडीवर पडला होता. बंटू झोपण्यासाठी आई 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात, नाच' हे गाणं म्हणत होती.

आणि बंटूचा स्वप्नातच नाच सुरू होता.

# बंटू बसला ढगांत

मे महिना संपून जून महिना सुरू झाला. उन्हाळा जवळजवळ संपलाच. आकाशात ढगांची धावपळ सुरू झाली होती. निळ्या निळ्या आकाशात कुठे कुठे काळ्या काळ्या ढगांचे पुंजके दिसू लागले. पांढरे पांढरे, रेशमी ढग सुरूसुरू पळत, तर काळे काळे ढग हत्तीसारखे आकाशातच डुलत रहात. काळ्या काळ्या ढगांचे आकारसुद्धा किती सुंदर. कधी ते भल्या थोरल्या हत्तींसारखे वाटत तर कधी काळ्याकभिन्न गेंड्यांसारखे. कधी छोट्याशा उंदरांसारखे तर कधी कावळ्यांच्या थव्यासारखे. हे ढगांचे आकार पाहून बंटू अगदी वेडापिसा होऊन गेला होता. वारा सुटला की ढगांची होणारी पळापळ तर बंटूला फार आवडे.

एकदा बंटू अंगणात बसून ढगांची गंमत पहात होता. इतक्यात टप् करून त्याच्या कपाळावर एक पाण्याचा थेंब पडला. त्याने पटकन डोळे बंद केले तर त्याच्या डोक्यावर, नाकावर टपाटप थेंब पडले. गार गार पावसाचे थेंब.प्रथम बंटूला वाटलं, पिंकीताईच पाणी उडवते आहे की काय? बंटूने अलगद डोळे उघडले. आणि पहातो तर काय, त्या मघाच्याच काळ्या हत्ती-ढगातून पाण्याचे थेंब टपटपत होते. बंटूला इतका आनंद झाला की तो तसाच पावसात भिजत राहिला. अंगणात उताणा पडून, डोळे बंद करूनआणि तोंड उघडं ठेवून तो पाऊस पीत राहिला.



बंटूच्या साऱ्या अंगावर पहिला पाऊस बरसत होता. बंटूच्या अंगावर शहारे आले.


बंटूने डोळे बंद केले खरे, पण त्याला असं वाटलं, आपण एका मऊ मऊ काळ्या काळ्या ढगावर झोपलो आहोत. गार गार वाऱ्याबरोबर ढग हळू हळू तरंगत चाललाय. आपणही ढगाबरोबर लांब लांब चाललोय. ढगातल्या थंड थंड पाण्याने बंटूला वाजू लागली थंडी. आता काय करायचं? इतक्यात त्याला एक कल्पना सुचली. त्या काळ्या ढगाच्या वरून एक छोटासा पांढरा ढग उडत चालला होता. पटकन बंटूने त्या ढगाला पकडलं आणि अंगाभोवती लपेटून घेतलं.असा पांढरा गुबगुबीत स्वेटर घातल्यावर बंटूची थंडी पळून गेली.

बंटू ढगातून खाली डोकावून पाहू लागला. छोटी-छोटी घरं, आडवीतिडवी शेतं, लांबच लांब पसरलेल्या नद्यांच्या रेषा आणि हिरव्या हिरव्या डोंगरांच्या जणू झाल्या होत्या उश्या.

बंटू अगदी हरखून गेला. बंटू ढगाला म्हणाला, "ए, चल ना रे माझ्या मामाच्या गावाला. माझं तिथे एक छोटंसं काम पण आहे."

"आँ? कुठलं काम?" ढगाने विचारलं.

बंटू सांगू लागला,"आपण भराभरा जाऊन मामाच्या घरावर थांबू. तिथे तू तुझ्याकडचं सगळं



पाणी मामाच्या घरावर ओत. पाणी कसं पडलं पहायला गच्चीवर सगळी जणं येतील. मग मी आईला हाक मारीन."

त्यावर ढग म्हणाला, "म्हणजे, तुझी आई मामाकडे गेलीय की काय?"

बंटू म्हणाला, "हो ना! आजच सकाळी गेली आणि उद्या संध्याकाळी येणार आहे. अरे, तू पाहिलं नाहीस का तिला जाताना?"

ढग म्हणाला, "नाही रे. आज सकाळी किनई मी दुसऱ्या गावाला होतो. तो लांब डोंगर दिसतो ना, त्यापलीकडे एक नदी आहे. तिथल्याच एका गावात मी होतो."

ढग नुसताच बंटूशी गप्पा मारत होता. पण पुढे काही सरकेना. म्हणून कंटाळून बंटू म्हणाला, "अरे, आपण माझ्या मामाच्या गावाला कधी जायचं?"

ढग जोरात हसला. त्या वेळी जमिनीवरच्या लोकांना ढगांचा गडगडाट ऐकू आला. ढगातलं पाणीदेखील डुचमळलं. बंटू ढगातच असल्याने गार गार पाण्याचा एक मोठा घोट त्याने गिळला.

बंटू चिडून म्हणाला, "किती जोरात हसतोस? माझ्या नाका-तोंडात पाणी गेलं ना रे!"

ढग म्हणाला, "सॉरी बुवा! मी विसरलोच तू आहे ते. मी आपला सवयीप्रमाणे दणक्यात गडगडलो. अरे बंटू, तुझ्या मामाच्या गावाला आपण जाऊच की. आता संध्याकाळ झाली की वाऱ्याची



दिशा बदलेल, त्याचा जोर वाढेल, मग आपण झपाझप सरकत जाऊ.''

तेवढ्यात तेथून डुलत एक लठ्ठ ढग आला. तो म्हणाला, ''काय, ओळखलं का बंटू?'' बंटू चाट पडला. हा कोण बरं?

तो ढग म्हणाला, ''अरे, असं काय करतोस? मघाशी मी गेंडा होतो पण आता हत्ती झालोय. येतोस का फिरायला? चल, बस माझ्या पाठीवर.''

बंटू म्हणाला, ''नको रे बाबा. मला माझ्या मामाच्या गावाला जायचं आहे. मी आईला चकित करून सोडणार आहे. आता थोड्या वेळाने जोरात वारा सुटला की, आम्ही पळायला लागणार.''

''वारा येईपर्यंत थांबता कशाला?'' असं स्वतःशीच बडबडत तो हत्ती ढग लांब गेला. आणि धावत येऊन त्याने बंटूच्या ढगाला अशी जोरात धडक मारली की बस्स रे बस! बंटूचा ढग गडबडा लोळत निघाला तो थेट डोंगरापाशी जाऊन थांबला. बंटूच्या ढगाला एवढ्या धावपळीने चांगलीच धाप लागली. तो थोडा वेळ डोंगराला टेकून उभा राहिला. त्याचं सारखं हाशहुश होत होतं. थोड्या वेळाने तो बंटूला म्हणाला, ''हं, हा आला डोंगर आणि हे तुझ्या मामाचं गाव. अरे पण बंट्या, तुझ्या मामाचं घर ओळखायचं कसं?''





ह्या ढगांच्या गडबडीत बंटू चांगलाच भिजला होता. त्याने हाक्शी करत चांगल्या दोन-चार शिंका दिल्या आणि नाक पुसत म्हणाला, "हॅं! ते तर एकदम सोपं. आपल्याला तर डोळे आहेत, पण आंधळ्या माणसालासुद्धा माझ्या मामाचं घर ओळखता येईल."

हे ऐकून ढगाला आश्चर्य वाटलं. तो म्हणाला, "आँ? ते कसं काय बुवा?"

बंटू हसला. त्याने ढगातलंच पाणी ढगावर उडवलं, आणि म्हणाला,




"एक तर खरं! एका सुंदरशा बागेत माझ्या मामाचं घर आहे. घरात शिरताना उंजवीकडे दिसतात लाल, गुलाबी, पिवळ्या रंगांच्या गुलाबाचे ताटवे. डावीकडे डवरलेला घमघमीत मोगरा. रस्त्यावरून जाणारी माणसं ह्या वासानेच वेडीपिशी होतात. बागेच्या चार कोपऱ्यांत चार सोनचाफ्याची झाडं आहेत. झाडावर दिवे लावल्याप्रमाणे ही फुलं दिवसभर - होय दिवसभर - लकाकत असतात. रात्री मंद चंद्रप्रकाशात हे दिवे तेवत असतात. पहाटे मात्र दुसऱ्या दिव्यांना वाट करून देण्यासाठी कधी तरी विझून जातात. घराला लागूनच एक प्राजक्ताचं झाड आहे. हे झाड इतकं उंच आहे की घराच्या गच्चीवर प्राजक्तांच्या फुलांचा सडा पडलेला असतो. घराच्या पाठीमागे गच्च आमराई आहे. अरे ढगा, त्या आमराईच्या आंबेमोहोराचा मस्त गंध आणि कोकिळेचं सुरेल कुहूकुहू तू ऐकशील तर मी नक्की सांगतो, प्रेमाने तू तिथेच

बरसू लागशील. ह्याच आमराईत मामाने एक मोरही पाळला आहे. फार पूर्वी मामा जंगलात गेला होता. तिथे त्याला वाट चुकलेलं एक मोराचं पिल्लू मिळालं. ते त्याने घरी आणलं. आपल्या मुलाप्रमाणे त्याची काळजी घेतली. आता तो मोर चांगलाच मोठा झाला आहे.''

एवढं सगळं भराभरा बोलून बंटूला धाप लागली. तो ढगातलचं थोडं पाणी प्यायला आणि ताजातवाना झाला.

हे सारं ऐकल्यावर ढगाला उत्साह आला. तो झपाट्याने गावाकडे निघाला. आता, मामाच्या घरी जायचं, आईला चकित करायचं म्हणून बंटूही खूष होता. तरारलेली गुलाबाची फुले, मोगऱ्याचा घमघमाट आणि चकाकणारे सोनचाफे पाहिल्यावर बंटूने ओळखलं, हेच मामाचं घर. तर, मोराचं ढगाकडे पाहून आर्त ओरडणं आणि आनंदाने पिसारा फुलवून त्याने केलेला नाच पाहून ढगाने ओळखलं की हेच बंटूच्या मामाचं घर.

ढग हळूहळू खाली उतरला. घराच्या गच्चीवर तरंगत राहिला. आकाशातच डूलू लागला. मधेच हळूशी गडगड करी, चमचम विजांनी लखलख करी. बंटूला अगदी घाई झाली होती. पण ढगाचं सारं लक्ष होतं मोराकडे. मोर ढगाला पाहून आनंदाने वेडा झाला होता. तो स्वतः- भोवतीच गिरक्या घेई, गोल गोल रिंगण करी. कधी मान हलवून डोक्यावरचा तुरा हलवी तर कधी एक पाय नाचवून



साऱ्याला झोका देई. कधी पिसारा फुलवून उड्या मारी. त्याचं नाचताना अगदी भान हरपून गेलं होतं.


बंटूची अवस्थादेखील त्या मोरासारखीच झाली होती. तोही आपल्या आईला भेटायला तितकाच उतावीळ झाला होता. कधी एकदा आपण आईला पहातो, तिला हाक मारतो, तिला चकित करतो, आणि ढगातून अलगद उडी मारून तिच्या कुशीत जातो असं त्याला झालं होतं. आमराईत पाऊस पडावा म्हणून मोर तळमळत होता तर आपल्याला आई भेटावी म्हणून बंटू कासावीस झाला होता.

इतक्यात तो ढग थोडासा वर गेला. बंटू घाबरला. आता आपल्याला आई भेटणार नाही की काय? तो ढगाला म्हणाला, ''अरे असं रे काय करतोस?''

त्यावर ढग हसतच म्हणाला, ''अरे बंटू, तुला कळत कसं नाही? मी जर थोडा वर जाऊन बरसलो तर नुसतं घरावरच नव्हे तर बागेत आणि माझ्या मित्राला, मोराला, पण पाणी मिळेल की.''

बंटू हसला. त्याला ढगाचं म्हणणं पटलं. ढग धडाडधूम करून बरसू लागला. अक्षरशः कोसळू लागला.

मामाच्या घरातले सर्वजण गच्चीवर आले. पण बंटूला आई काही दिसेना. तो जोरजोरात हाका मारू लागला, ''आई, आई, आऽऽई, आऽऽऽई....''



BVBK-0402806

इतक्यात बंटूच्या घरातून बंटूचे बाबा बाहेर आले, आणि म्हणाले, "अरे बंट्या, असं पाऊस खात अंगणात का कधी झोपतात? चल घरात. सर्दी होईल ना. आणि आई-आई असं कशाला ओरडत होतास रे?"

बाबांनी बंटूला जवळ घेतलं. त्याचे ओले कपडे काढले. त्याचं अंग कोरडं केलं, आणि म्हणाले, "आठवण आली का रे आईची? चल, डोळे उघड बघू. उगाच झोपायचं सोंग घेऊ नकोस. बाहेर बघ किती छान पाऊस पडतोय."

बंटूने सावकाश डोळे उघडले. आपण खरंच मामाकडे गेलो होतो, ढगात बसलो होतो की, आपल्याला स्वप्न पडलं हेच त्याला क्षणभर कळेना. त्याने पुन्हा डोळे बंद केले आणि म्हणाला, "आई आली का हो बाबा?"

"आई येईल हं बाळ उद्या." बाबा म्हणाले आणि बंटूला थोपटू लागले. हवेत गारठा असल्याने बाबांनी बंटूला मऊमऊ उबदार पांघरूण घातलं.

पांघरूण घेतल्यावर आपण पुन्हा एकदा ढगात बसलोय असं बंटूला वाटलं. मात्र ह्या वेळी स्वप्नात त्याला थोपटायला त्याची आई होती. बंटूने हळू हळू डोळे बंद केले. आणि तो ढगांच्या कुशीत झोपी गेला.

